# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी
## नगररचना विभाग

### जाहीर सूचना

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना कळविण्यांत येते की, शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ (१) अन्वये महाराष्ट्र शासन निर्णय क्र.टिपीबी-४३१७/१०९/सिआर-११/२०१७/युडी-११, दि.२२/०८/२०१७ नुसार राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता) विकास नियंत्रण नियमावलीमध्ये जोखिम आधारीत (Risk Based) इमारत परवानगी मंजूरीच्या प्रक्रियेबाबत निर्देश दिले आहेत. सदर निर्देशाची अंमलबजावणी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथे करणेत येत आहे.

सदर निर्देशान्वये मनपा हद्दीतील इमारत परवानगी मंजूरीच्या टप्प्यामधील अनेक प्रक्रिया तसेच त्यास लागणारा कालावधी कमी करणे, इमारत परवानगी मंजूरी प्रक्रिया सुलभतेने (Ease of Doing Business ) करणेसाठी महानगरपालिकेच्या परवानाधारक वास्तुविशारद /अभियंता/ सर्व्हेअर यांना २०० चौ.मी. पर्यंतच्या प्रस्तावित बांधकामास सशर्त मंजूरीचे अधिकार प्रदान केले आहेत.

तरी उक्त निर्देशानुसार २०० चौ.मी. पर्यंतची इमारत परवानगी प्रकरणात पुढील कार्यवाही होण्यासाठी आवाहन करणेंत येत आहे.

(अ.अ.शेख)
सहाय्यक संचालक,नगररचना
भिवंडी निजामपूर शहर महानरगपालिका,भिवंडी

(मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने.)